# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### वडवणी (जि.बीड) शहरातील वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुद योजनेंतर्गत विद्युतीकरण करणेचे काम न करताच बिल उचलल्याबाबत

**(१) ३४६८१ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी (जि.बीड) शहरातील वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुद योजनेंतर्गत विद्युतीकरण करणेचे काम न करताच बिल उचलल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांचे दि. २० फेब्रुवारी, २०२१ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयास दि. १५ एप्रिल, २०२१ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, बीड यांनी दि. १५ एप्रिल, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, वडवणी नगरपंचायत यांना कळविण्यात आले होते. तथापि, मुख्याधिकारी, वडवणी नगरपरिषद यांच्याकडून अहवाल प्राप्त न झाल्याने, जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत दि. ०५ डिसेंबर, २०२२ रोजी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

तसेच सदर प्रकरणाचा तात्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने दि. ०७ डिसेंबर, २०२२ रोजी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्या स्तरावर चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे करंजाडे (ता.पनवेल-उरण, जि.रायगड) येथील कायमस्वरूपी वास्तव्यास असलेल्या आदिवासी बांधवांचे बांधकाम नियमित करण्याबाबत

**(२) ४४६८६ (१०-११-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करंजाडे (ता.पनवेल-उरण, जि.रायगड) येथील डेडीकेटेड फ्रेट कॉरीडॉर प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कायमस्वरूपी वास्तव्यास असलेल्या आदिवासी बांधवांचे बांधकाम नियमित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सहव्यवस्थापकीय संचालक ३, सिडको लि., सिबीडी बेलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे करंजाडे विभागातील अनेक वर्ष पिढयांपिढया राहत असलेल्या जवळपास १२ आदिवासी बांधवांचे बांधकाम अपात्र ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक वर्ष वास्तव्य करीत असलेल्या प्रकल्पबाधित आदिवासी बांधवांच्या पुनर्वसनाबाबत कोणतीच उपाययोजना न करता आदिवासी बांधवाच्या अशिक्षित व अडाणीपणाचा फायदा घेवून स्थानिक प्रशासनामार्फत बांधकामे अनधिकृत ठरवून बांधकामावर कारवाई करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याच्या धोरणानुसार करंजाडे येथील आदिवासी बांधवांची घरे नियमित करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०५-२०२३) :** (१) होय खरे आहे.
(२) करंजाडे गावातील ३७ बांधकामधारकापैकी २५ बांधकाम धारकांना पात्र केले असून, उर्वरित १२ बांधकामधारकांकडे दि.१३/८/२०१० पुर्वीच्या रहिवासाचा पुरावा नसल्याने अपात्र केले आहे, हे खरे आहे.
(३) सदर बांधकामधारकांकडून त्यांचे दिनांक १३/८/२०१० पुर्वीचे रहिवासाबाबतचे वीजबील, घराबाबतची करपावती व ॲसेसेमेंट उतारे इत्यादी पुरावे घेण्यात आले असून सदर पुराव्यावरुन बांधकामधारकांची पात्रता ठरविण्यात आलेली आहे. याकामी करंजाडे गावातील एकूण ३७ बांधकामधारकांपैकी या कार्यालयाकडून २० बांधकामधारकांना पात्र करण्यात आले होते. उर्वरीत १७ बांधकामधारकांना अपात्र करण्यात आले आहे या १७ बांधकामधारकांनी मा. उपआयुक्त (पुनर्वसन) कोंकण विभाग यांजकडे अपिल दाखल केले व त्यापैकी १२ बांधकामधारकांना अपात्र ठरविले असून ५ बांधकामधारकांना पात्र ठरविण्यात आले आहे. शासकीय जमीनीवरील २४ व सिडकोच्या जमीनीवरील १ अशा एकुण २५ बांधकामधारकांना नियमानुसार पात्र करण्यात आले असून, त्याचे पुनर्वसन कामी रुपये ३४०.०८ लक्ष इतक्या मोबदल्याचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांच्या अशिक्षित व अडाणीपणाचा फायदा घेवून बांधकामे अनधिकृत ठरवून बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) सदरची अपात्र बांधकामे नियमित करण्याची पुनर्वसन अधिनियमात तरतुद नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औदयोगिक वसाहतीतील श्री पुष्कर केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स युनिट-३ या कारखान्यातील राखेमुळे होत असलेले प्रदुषण

**(३) ४४८८३ (१७-०९-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे (ता. खेड) औदयोगिक वसाहतीतील श्री पुष्कर केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स युनिट-३ या कारखान्यातील कोळशाची राख मागील ८ महिन्यांपासून उघडयावर टाकली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू राख वाऱ्याच्या प्रवाहामुळे लगतच्या लोटे माळवाडी तसेच परिसरातील मानवी वस्तीमध्ये पसरत असल्याने तेथील नागरिकांना श्वसनाचे विकार उद्भवू लागल्याचे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत लोटे माळवाडी येथील ग्रामस्थांनी वारंवार प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांचेकडे लेखी तक्रारी सादर करुन कंपनीवर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तक्रारींची दखल घेवून शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०५-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तालुका आरोग्य अधिकारी, खेड यांच्या दि. ०५.०७.२०२२ रोजीच्या अहवालानुसार नागरींकामध्ये श्वसनाचे विकार असलेले रूग्ण आढळून आलेले नाहीत.

(३) व (४) अशंत: खरे आहे.

सदर उद्योगास दि. २३.०२.२०२२ रोजी कोळशाच्या राखेची विल्हेवाट लावण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने समजपत्र देण्यात आलेले होते. तद्नंतर दि. ०५.०७.२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश व दि. २१.०२.२०२३ रोजी अंतरिम आदेश देण्यात येऊन रु.१.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर व जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांचे मोठ्याप्रमाणात हाल होत असल्याबाबत

**(४) ४४९३७ (२५-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांचे मोठ्याप्रमाणात हाल होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांनी घरातील वृद्धांचे संगोपन करण्यासंदर्भातील कायदा प्रलंबित असल्याने ७०% पेक्षा अधिक वृद्ध मुल तसेच सुनांकडून होणाऱ्या त्रासातून हतबलतेने जीवन जगत असल्याचे ही निदर्शनास आले हे ही, खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठ नागरिक घरात एकटेच असल्याचे प्रमाणही मोठे असल्याने आर्थिक तसेच कौटुंबिक कारणासाठी वृद्धांची हत्या करण्यात आल्याचे प्रकार देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्य अनुषंगाने काय निष्पन् झाले,

(५) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा व वृद्ध पालकांचा सांभाळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पुणे शहर व जिल्हयात ज्येष्ठ नागरिकांचे मोठया प्रमाणात हाल होत असल्याने माहे जानेवारी, २०२२ ते नोव्हेंबर,२०२२ पर्यंत एकूण ५७५ तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एकूण ५ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ५०५ अर्जाची निर्गती करण्यात आल्याचे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी नमूद केले आहे.

(३) अंशत: खरे आहे,

१) पुणे शहर-२ गुन्हे

२) पिंपरी चिंचवड- ३ गुन्हे

३) पुणे ग्रामीण -२ गुन्हे

(४) प्रस्तुत प्रकरणी पोलीस तपास व न्याय प्रविष्ठ आहेत.

(५) १) ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारी व समस्या सोडविण्यासाठी २४ तास निशुल्क राष्ट्रीय हेल्पलाईन (Toll free No.१४५६७) जनसेवा फौंडेशन, पुणे यांचे मार्फत कार्यान्वित आहे.

२) ज्येष्ठ नागरिकांसाठी पुणे पोलीस विभागामार्फत भरोसा सेल (हेल्पलाईन नंबर १०९०) चे माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारीची नोंद घेऊन तात्काळ कार्यवाही केली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात पुरातन वास्तू जतन करण्यासाठी हेरिटेज कमिटी स्थापन करण्याबाबत**

**(५) ४५४३२ (०९-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शारदे तीर्थक्षेत्र असून येथे अनेक पुरातन वास्तू असून देखिल शहरात हेरिटेज कमिटी स्थापन करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हेरिटेज कमिटी नसल्यामुळे अंदाजपत्रकाच्या दोन टक्के रक्कम पुरातन वास्तूंच्या विकासासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे काय,

(३) असल्यास, आरक्षित केलेल्या रकमेचा खर्च करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, हेरिटेज कमिटी स्थापन करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) हेरिटेज कमिटी स्थापन झालेली असल्याने विलंबाचा प्रश्न व कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात मंजूर १७ पदांपैकी १६ पदे रिक्त असल्याबाबत**

**(६) ४७८१६ (०६-१०-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागात मंजूर १७ पदांपैकी १६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासासाठी विविध शासकीय योजना राबविण्यासाठी समाज कल्याण विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने विविध योजनांपासून लाभार्थ्यांना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी एवढया मोठया प्रमाणात पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत व रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने काणेती कार्यवाही केली वा करण्यात येत ओहत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी स्थानिक व्यवस्थेतर्गत इतर विभागातील अधिकारी यांचेकडे सोपविला आहे. तसेच अन्य संवर्गाचे कामकाजासाठी कामकाज व्यवस्थेतर्गत प्रतिनियुक्तीने गट-क संवर्गातील दोन कर्मचारी प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेले आहेत व गट- ड संवर्गातील एका कर्मचाऱ्याची बाह्यस्त्रोताव्दारे प्रतिनियुक्ती देण्यात आली असून अन्य तीन गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदभार सक्षम कर्मचाऱ्यांकडे अतिरीक्त कार्यभार म्हणून सोपविण्यात आलेला आहे. असे एकूण ६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) समाज कल्याण आयुक्तालयांच्या अतर्गत गट-अ व गट-ब संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच गट-क संवर्गातील पदे शासनाने ठरविलेल्या TCS, IBPS, या दोनपैकी एका कंपन्यामार्फत भरण्याची कार्यवाही आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या स्तरावरून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक ) तालुक्यातील शेतकऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून शेतीचे नुकसान भरपाईचे अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(७) ४८६१२ (२०-०९-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक ) तालुक्यातील शेतकऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून शेतीचे नुकसान भरपाईचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्ताणे येथील तलाठ्यानी ज्या बॅकेत शेतकऱ्यांचे खातेच नाही अशा बँकेचा नंबर यादी दिली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान गेल्या दोन वर्षापासून मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचे अध्यक्षेतेखाली गठीत केलेल्या समितीच्या अहवालातील पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुसाभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०५-२०२३) :** (१) माहे जून ते ऑक्टोबर,२०२० या कालावधीत अतिवृष्टी व पूरामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मालेगाव तालुक्यासाठी अनुक्रमे सन २०२०-२१ मध्ये रु.८९.३१ लक्ष व सन २०२१-२२ मध्ये रु.५९.७० लक्ष असा एकूण रु.१४९.०१ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तथापि, अतिवृष्टीच्या निकषानुसार शेतीपिकांचे नुसान झालेल्या काही शेतक-यांना मदत मिळाली नाही, हे खरे आहे.

(२) उपविभागीय अधिकारी, मालेगाव यांचेकडील अहवालानुसार मालेगाव तालुक्यात अशी बाब निदर्शनास आलेली नाही. मौजे-अस्ताने, ता.मालेगाव येथे सन-२०२० मध्ये ६०५ शेतक-यांना रु.४४,१३,६०४/- व सन-२०२१ मध्ये ६०६ शेतक-यांना रु.२८,४४,६६१/- इतका निधी वाटप करण्यात आलेला आहे.

(३) होय, निधी वाटपा संदर्भात चौकशी करणेकामी अपर जिल्हाधिकारी मालेगाव यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणातील दोषी अधिकारी तहसिलदार, मालेगाव तसेच, संबंधित संकलन महसूल सहायक, तहसिल, मालेगाव आणि सजा वडगाव,नरडाणे, अजंग/निळगव्हाण आधार बु. ढवळेश्वर व बेळगाव, अजंदे बु. या सजेच्या तलाठयांविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे. तसेच, कृषी विभागाकडील व ग्रामविकास विभागाकडील दोषी अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई सुरु करणेबाबत संबंधित खाते प्रमुखांना जिल्हाधिकारी यांचेकडून लेखी कळविण्यात आले आहे.

(४) समितीच्या शिफारशीनुसार वाटपासाठी देय असलेले रु.६,०६,०८,४४७/- व सततच्या पावसामुळे ३३ टक्के पेक्षा अधिक झालेल्या पिक नुकसानीसाठी रु.१९,५१,००,०००/- यास खास बाब म्हणून मान्यता देऊन एकूण रु.२५,५७,०८,४४७/- इतका निधीची मागणी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी शासनाकडे केली होती. त्याअनुषंगाने महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.१५.०७.२०२२ अन्वये रु.६,०६,०८,०००/- इतका देय निधी मंजूर करण्यात आला असून, हा निधी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या कार्यालयीन आदेश क्र.कक्ष-१३/३/टंचाई /७/२६/४४६/ २०२२, दि.२८.७.२०२२ अन्वये तहसिलदार मालेगाव यांना वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरित निधीची मागणी निकषात बसत नसल्याने अमान्य करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतील निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविण्याबाबत**

**(८) ४९४३२ (१०-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-वाघाळा (जि.नांदेड) शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने महानगरपालिकेच्या मालकीच्या महात्मा फुले व्यापारी संकुल तसेच जनता मार्केट शिवाजीनगर व्यापारी संकुल यांच्या BOT/PPP तत्वावरील विकास कामांना मान्यता प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांच्या निविदा प्रक्रियेस शासनाने स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड-वाघाळा महानगरपालिका ही ‘ड’ वर्ग महानगरपालिका असून शासनाकडून मिळणारे अपुरे अनुदान व महानगरपालिकेचे अत्यल्प उत्पन्न लक्षात घेता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने, महानगरपालिका स्वनिधीतून सदर विकास कामे होऊ शकणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही व्यापारी संकुलाच्या इमारती खुप जुन्या असून तांत्रिक दृष्ट्या व सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून सदर इमारती वापरण्यास योग्य नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिकेने महानगरपालिका अधिनियमांतर्गत तरतुदीनुसार प्रक्रीया नियमांचे काटेकोरपणे पालन करुन निविदा प्रक्रिया राबविली असल्यामुळे या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त निविदा प्रक्रीयेस देण्यात आलेली स्थगिती उठवण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीचे महात्मा फुले मार्केट PPP तत्वावर विकसीत करण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.२२ दि.२.४.२०१३ व ठराव क्र.१४६ दि.२७.२.२०१७ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

तसेच जनता मार्केट शिवाजीनगर व्यापारी संकुल PPP तत्वावर विकसीत करण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३७ दि.२२.११.२०२१ व ठराव क्र.४३ दि.१०.८.२०२२ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

(२) होय. हे खरे आहे.

शासन पत्र दिनांक ७.९.२०२२ अन्वये महात्मा फुले व्यापारी संकुलाबाबत महानगरपालिकेने विकासकासोबत केलेल्या करारास व जनता मार्केट, शिवाजीनगर व्यापारी संकुल निविदा मंजुरीला स्थगिती दिली आहे.

(३) व (४) होय. हे खरे आहे.

दोन्ही व्यापारी संकुलाच्या इमारती मोठ्या प्रमाणात नादुरुस्त असून नविन विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम केल्यास उपलब्ध TDR/FSI नुसार वाढीव बांधकामासह वाहनतळ व इतर अत्याधुनिक सेवा उपलब्ध करुन देणे शक्य आहे.

तथापि, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदरचे व्यापारी संकुल स्वनिधीतून बांधणे शक्य होणार नसल्याने सदरचा प्रकल्प BOT/PPP तत्वावर हाती घेण्यासाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेने मान्यता प्रदान केल्यानुसार दोन्ही प्रकल्प हाती घेण्यात आल्याचे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(५) होय. हे खरे आहे.

(६) महात्मा फुले व्यापारी संकुलाबाबत महानगरपालिकेने विकासकासोबत केलेल्या करारास व जनता मार्केट, शिवाजीनगर व्यापारी संकुल निविदा मंजुरीला देण्यात आलेली स्थगिती नगर विकास विभाग,शासन निर्णय, दि.२३.३.२०२३ अन्वये उठविण्यात आली आहे.

---

**मौजे तिवरे (ता.चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील धरण फुटीच्या चौकशीबाबत**

**(९) ४९६०५ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तिवरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरण फुटून २३ जणांना प्राण गमवावे लागल्याची दुर्घटना दिनांक २ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेच्या चौकशीसाठी विशेष तपासणी पथक (एसआयटी) आणि नंतर डॉ.दिलीप पांढरपट्टे यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन चौकशी समिती नेमण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच उक्त चौकशी समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालामध्ये कोणते निष्कर्ष काढण्यात आले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०५-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर धरणफुटीच्या अनुषंगाने पुनर्विलोकन समितीने अहवाल दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी सादर केला आहे

(४) होय, सबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याच्या दृष्टीने उपस्थित मुद्दयांच्या अनुषंगाने विभागीय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळामधील महिला कर्मचारी बालसंगोपन रजेपासून वंचित असल्याबाबत**

**(१०) ४९९६६ (१८-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या महिला कर्मचाऱ्यांना तसेच ज्या कमर्चाऱ्यांच्या पत्नी अनेक आजाराने ग्रस्त आहेत अशा कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजा देण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळामधील महिला कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या बालसंगोपन रजेचे नीट पालन होत नसल्याचे माहे सप्टेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निकषात बसणाऱ्या सर्व स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांची पगारी रजा देण्याचे व त्याचे योग्यरित्या पालन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेचा लाभ शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र./२५/सेवा-६, दि.२३.०७.२०१८ अन्वये देण्यात आला असून त्याची अमंलबजावणी रा.प. महामंडळात देखील करण्याबाबत, महामंडळ ठराव क्र.२०१८:१२:३३, दि.३१.१२.२०१८ पारित करण्यात आला आहे व त्यानुसार परिपत्रकीय सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

रा.प.महामंडळातील ज्या पुरुष कर्मचाऱ्यांची पत्नी विविध आजाराच्या कारणास्तव जेवढया कालावधीसाठी अंथरुणात खिळलेली आहे, अथवा ज्यांची पत्नी मनोरुग्ण असल्यामुळे जेवढया कालावधीसाठी बालसंगोपन करण्यास असमर्थ होत आहे, अशा रा.प. महामंडळाच्या पुरुष कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.२५/सेवा-६ दि.१५.१२.२०१८ नुसार विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनेच्या अधिन राहून १८० दिवस

कमाल मर्यादेपर्यंत बालसंगोपन रजा देण्याबाबत दिनांक.३०.०८.२०१९ रोजी ठराव झाला असून,दि.२०.०९.२०१९ रोजी परिपत्रकीय सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पात्र कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ देय केलेला आहे.

---

### केंद्र शासनाकडून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी देण्यात येणाऱ्या निधीबाबत

**(११) ५०१४२ (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी देण्यात येणाऱ्या १५० कोटी रुपयाच्या निधीसाठी राज्य शासन हमी देणार असल्याचे माहे मार्च,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातर्फे वितरीत केलेल्या कर्जा पैकी किती कर्जाची परतफेडेची रक्कम महामंडळाकडे जमा झाली आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उर्वरित कर्जाच्या वसुलीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०५-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे,

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्याकडून महामंडळाने शासन हमीवर आतापर्यंत रु. ९४.३४ कोटी इतके कर्ज घेतले आहे.

(२) विविध कर्ज योजनेअंतर्गत माहे डिसेंबर २०२२ पर्यंत ८२९५४ लाभार्थ्यांना रु. ४७१.१४ कोटी इतके कर्ज वितरीत करण्यात आले असून त्यापैकी रु. ५३.७३ कोटी इतकी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

(३) विभागनिहाय वसुली कामे पार पाडण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वसुली अधिकाऱ्यांना संबंधीत विभागातील जिल्हयातील कर्ज वसुलीसाठी लाभार्थ्यांशी व जामीनदारांशी संपर्क साधणे, नोटीसा पाठविणे, लाभार्थ्यांना प्रत्यक्ष भेट देऊन वसुलीसाठी प्रोत्साहित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य परिवहन महामंडळाला महाग डिझेल मिळत असल्याबाबत

**(१२) ५०१४८ (१८-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाला तेल कंपन्याकडून होलसेल दरात दिले जाणारे डिझेल लिटरमागे २३ रुपयांनी महाग असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वाढीव दराने डिझेल खरेदी केल्यामुळे एसटी महामंडळाला आजपर्यंत किती रक्कमेचा भरणा करावा लागला असून सदर डिझेल कमी दराने खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१), (२) व (३) मार्च २०२२ च्या दरम्यान घाऊक व किरकोळ दरातील तफावत निर्दशनास आल्याने, रा.प.महामंडळाने तेल कंपन्यांकडून डिझेलची थेट खरेदी बंद केली व किरकोळ विक्रेत्यांच्या खाजगी डिझेल पंपावरुन डिझेल खरेदी करण्यात येते. त्यामुळे वाढीव दराने डिझेल खरेदी झालेली नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याबाबत**

**(१३) ५०१६३ (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील बस स्थानकात गत महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकात प्रवाश्याना सोयी-सुविधा मिळणे ही अत्यावश्यक बाब असून देखील काही बस स्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असूनही दुषित पाणी येत असल्यामुळे शेकडो प्रवासी साथीच्या रोगाने मोठया प्रमाणात आजारी पडत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे, त्यानुसार बस स्थानकात पिण्यायोग्य शुध्द पाणी प्रवाशांना पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर ठिकाणी प्रवाशांना पिण्यासाठी २००० लिटर पी.व्ही.सी. टँक बसवून त्या सोबत वॉटर कुलर बसविण्यात आलेला आहे.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथे मुख्य नवीन बसस्थानकात वाहनतळ (पार्किंग) सुविधा करण्याबाबत**

**(१४) ५०२११ (१८-०१-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील मुख्य नवीन बसस्थानकात वाहनतळ सुविधा बंद केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकात वाहनतळ सुविधा बंद केल्यामुळे वाहतुकोंडी होत असून नारिकांचे गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी बस स्थानकात वाहनतळ सुविधा लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१), (२) व (३) होय.
(४) व (५) मालेगांव महानगरपालिका यांच्याशी समन्वय साधून मालेगांव बसस्थानकावर 'वाहनतळ' या वाणिज्य आस्थापनेकरिता जागा निश्चित करुन ई-निविदा प्रक्रिया कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक न झाल्याबाबत**

**(१५) ५०५९७ (२२-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रवाशांची प्रमुख वाहिनी असणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक पुढे ढकलण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षित प्रवास वाहतुकीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५,१५० विद्युत बसेस घेणे, सीएनजी ऐवजी दोन हजार डिझेल वाहनांचा समावेश करणे, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती यासह एकुण २६ विषय या बैठकीच्या सुचीमध्ये होते, हे ही खरे हे काय,
(३) असल्यास, दिनांक २८ आक्टोंबर, २०२२ व ०४ नोव्हेंबर, २०२२ अशा अनुक्रमे दोन वेळा बैठका रद्द झाल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांमध्ये उदासीनतेची भावना निर्माण झाली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांची सुधारीत वेतनवाढ, आधुनिक तंत्रज्ञानाच्या संकेतस्थळाचा विकास, पार्सल व कुरीअर सेवेतील कंपन्यांना मुदतवाढ देण्याबाबतचे धोरणात्मक निर्णय प्रलंबित असताना शासन वेळोवेळी बैठका रद्द करुन वेळकाढू भुमिका घेत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त विषयाबाबत बैठक घेवून निर्णय घेण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) व (२) होय.
(३), (४), (५) व (६)
दि.१८.११.२०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये नमूद केलेल्या विषयासह रा.प.महामंडळाच्या हिताच्या दृष्टिने धोरणात्मक व अधिकारी/कर्मचारी तसेच प्रवाशांच्या हिताचे निर्णय घेण्यात आले आहेत.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या वाडा आगारातील (ता.वाडा, जि.पालघर )**
**नादुरुस्त बस गाड्यांमुळे प्रवाशांची होत असलेली गैरसोय**

**(१६) ५०७६१ (१९-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाच्या वाडा आगारातील (ता.वाडा, जि.पालघर) बस गाड्या वांरवार नादुरुस्त होत असल्यामुळे प्रवाशांची प्रवास करताना गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे त्यानुसार नादुरुस्त बस गाड्यांऐवजी नवीन बसेस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) नाही.
(२) व (३) रा.प.महामंडळाच्या स्वमालकीच्या २००० साध्या बसेसकरिता चासिस खरेदी बाबत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

---

**लासलगाव, पिंपळगाव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) आगारात**
**नवीन बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१७) ५०८६० (१९-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासलगाव, पिंपळगाव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) आगारात कोरोनापूर्वी अनुक्रमे ५६ व ५३ बसेस उपलब्ध असतांना आजतागायत लासलगाव आगाराकडे ३४ तर पिंपळगाव बसवंत आगाराकडे ४० बसेस या फेऱ्यासाठी उपलब्ध आहेत हे माहे, नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आगारात बसेसच्या जादा फेऱ्या रद्द केल्याने प्रवांशाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नादुरुस्त बसेस ऐवजी नवीन बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) व (२) कोरोना पूर्वी रा.प. लासलगाव आगारात मार्च, २०२० या दैनंदिन वाहन स्थितीनुसार ५१ बसेस व पिंपळगाव आगारात ५२ बसेस उपलब्ध होत्या. तसेच माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये रा.प. लासलगाव आगारात ३८ व पिंपळगाव आगारात ३९ बसेस उपलब्ध आहेत.

सन २०२२ मध्ये प्रवासी मागणीनुसार वरीलप्रमाणे उपलब्ध बसेसद्वारे फे-या चालनात आहेत.
(३) व (४) सध्या रा.प. महामंडळाकडे नवीन बसेस घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

**महात्मा जोतीबा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित चित्रपटाच्या निर्मितीस होत असलेल्या विलंबाबाबत**

**(१८) ५०८७४ (२५-०१-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारीत चित्रपट निर्मितीकरीता राज्य शासनाने इलोक्योन्स प्रा.लि.या कंपनीबरोबर दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केलेल्या करारानुसार हा चित्रपट माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान करणे आवश्यक होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही हा चित्रपट पुर्ण करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चित्रपट लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज-२०२०/ प्र.क्र.५७/ कार्या-३४, दि.१४.९.२०२२ नुसार चित्रपट निर्मितीच्या प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकरीता नवीन बसेस खरेदी करण्याबाबत**

**(१९) ५११०१ (१८-०१-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या दरवर्षी तीन हजार गाड्या बाद करुन त्या मोबदल्यात दीड हजार नव्या गाड्या खरेदी करणे व दीड हजार गाड्यांचे नुतनीकरणाचे धोरण निश्चित असताना सन २०१६ ते २०१९ या कालावधीमध्ये नव्या गाड्या खरेदी न करता केवळ वापरातील गाड्यांचे नुतनीकरण केल्यामुळे सुमारे ६ हजार २८९ गाड्या भंगारात काढल्याची बाब दिनाक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दरवर्षी दीड हजार गाड्या खरेदी करणे व दीड हजार गाड्यांचे नुतनीकरण करणे या धोरणाची शासन तथा महामंडळाने अमंलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्यातील सर्व सामान्य जनतेस चांगल्या दर्जाची प्रवासी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आठ वर्षापूर्वीची वाहन बाद करुन उपरोक्त महामंडळाच्या धोरणाची नियमित अंमलबजावणी करुन खाजगी बसेसच्या धर्तीवर

अद्ययावत सुविधायुक्त नवीन बसगाड्या खरेदी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) नाही.
(२), (३) व (४) सन-२०१८-१९ व सन २०१९-२० या कालखंडात महामंडळाच्या वाहन ताफ्यात १३२० विविध प्रकारची नविन वाहने जमा करण्यात आलेली आहेत.

सन २०२२-२३ मध्ये ७०० नवीन वाहने महामंडळाच्या वाहन ताफ्यात टप्प्या-टप्प्याने दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर सन २०२३-२४ मध्ये २००० नवीन वाहने महामंडळाच्या वाहन ताफ्यात दाखल करण्यासाठी चासीस खरेदी करण्यासाठी ई निविदा प्रसारीत करण्यात आलेली आहे.

रा.प. महामंडळाच्या ताफ्यात नवीन १५० ईलेक्ट्रिक बसेस व ५०० साध्या बसेस भाडेतत्वावर घेण्यात येत असून, साध्या प्रकारातील ५०० बसेस पैकी काही बसेस दाखल झालेल्या आहेत व उर्वरित बसेस टप्प्याटप्प्याने रा.प. महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट होतील.

प्रवाशांच्या सेवेसाठी नवीन पर्यावरण पुरक बसेस खरेदी करण्याच्या अनुषंगाने ५३०० ई-बसेस रा.प. महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात येणार आहे. यापैकी १५० ई-बसेस करीता पुरवठादारासमवेत करार करण्यात आला असुन ५१५० ई-बसेस करीता निविदा प्रक्रिया प्रगत करण्यात आलेली आहे.

---

## अमरावती मध्यवर्ती बस स्थानकाची झालेली दूरवस्था

**(२०) ५१२३४ (१९-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील मध्यवर्ती बस स्थानकाची दूरवस्था झाली असुन इमारतीचे बांधकाम अत्यंत जीर्ण झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बस स्थानकात दरदिवशी ४०० ते ५०० बस फेऱ्या ये-जा करीत असून, तेथे नागरिकांची व प्रवाशांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते, त्यामुळे उक्त जीर्ण झालेल्या बांधकामामुळे येथे दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जिवीतहानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार अमरावती बस स्थानकाचे नव्याने बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) अमरावती जिल्ह्यातील मध्यवर्ती एस.टी. स्थानकाच्या नुतणीकरणाचे व दर्जावाढीचे काम करण्यात आले आहे. इमारतीचे आयुर्मान लक्षात घेता नव्याने ईमारत बांधकाम करण्याबाबत २०२३-२०२४ मध्ये प्रस्तावित आहेत.

---

## अमरावती जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळातील कंत्राटी चालकांची सेवा बंद केल्याबाबत

**(२१) ५१२६४ (२२-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळातील २०० पेक्षा अधिक कंत्राटी चालकांची सेवा बंद करण्याचा निर्णय महामंडळाने घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णया विरोधात संबंधित चालकांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयावर येऊन कंत्राटी चालकांना पुर्ववत कामावर रुजू करण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषगाने उक्त जिल्ह्यातील कंत्राटी बस चालकांना कामावर रुजू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) रा.प. कर्मचाऱ्यांनी दिनांक २७.१०.२०२१ पासून बेमुदत संप केला. महामंडळाने प्रवाशांची व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आपात्कालीन परिस्थितीत दिनांक ०७.०१.२०२२ पासून वृत्तपत्रात जाहिरात देऊन बाहय संस्थेमार्फत कंत्राटी चालकांची एक महिन्यासाठी नियुक्ती केली. मा.उच्च न्यायालयाने, "कामावर हजर व्हा" असा आदेश दिल्यानंतर संपकरी कामावर हजर झाले.त्यामुळे कंत्राटी चालकांची आवश्यकता उरली नसल्यामुळे अमरावती विभागासह इतर विभागातील कंत्राटी चालकांची नियुक्ती रद्द करण्यात आली.

---

## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपटासाठी कंपनीबरोबर केलेला करारनामा संपुष्टात आल्याबाबत

**(२२) ५१३०१ (२३-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपटाची निर्मिती मागील चार ते पाच वर्षापासून झाली नसुन सध्या चित्रपट निर्मिती कंपनीबरोबर केलेला करारनामा संपुष्टात आला असुन पुन्हा नव्याने ही सर्व प्रक्रिया प्रलंबित राहणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन शासनाने १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारीत पूर्ण लांबीचा चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता त्यावेळी केलेला करार संपुष्टात आल्याने पुन्हा याकरिता पुरवणी करारनामा केल्याने शासन आदेश काढुन चित्रपटाच्या निर्मितीस तांत्रिकदृष्टीने मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुषंगाने सदरहू चित्रपटाच्या निर्मितीस तांत्रिकदृष्टीने मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) होय.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०२०/प्र.क्र.५७/कार्या-३४, दि.१४.९.२०२२ नुसार चित्रपट निर्मितीच्या प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने नांदेड जिल्ह्यातील कामांच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविण्याबाबत

**(२३) ५१६८३ (२५-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने नांदेड जिल्ह्यातील सुमारे १०१ कामांचे सर्वेक्षण करुन व सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन अंदाजे रु.१८६८२.०० लक्ष इतक्या किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाकरिता दिड वर्षाहून अधिक कालावधी झाला असून सदर कामे निविदा प्रक्रियेवर असताना त्या कामांना शासनाने स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचा निधी खर्च झाला असताना सदर कामे थांबविण्याच्या निर्णयामुळे नांदेड जिल्ह्यातील विकासकामे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांचा हितासाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या उपरोक्त कामांच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुंषगाने निविदा प्रकियेस दिलेली स्थगिती उठविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०५-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) योजनांवर निधी खर्च झालेला नाही. शासन निर्णय क्र.मजम-२०२३/प्रक्र.७/जल-३ दिनांक .११.०१.२०२३ अन्वये प्राप्त योजना कार्यवाही मंडळाच्या मान्यतेने सुरु करण्याची मान्यता देण्यात आली आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) स्थगिती देण्यात आलेल्या १२९ कामांपैकी जलसंधारण महामंडळाकडून दि.२५.१०.२०२२ च्या पत्रान्वये नांदेड जिल्हयातील अनुक्रमे ०५ व २८ अशा एकूण ३३ कामांच्या निविदेला दिलेली स्थगिती उठविली असून सदर कामांची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

दि.११.०१.२०२३ अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील प्रशासकीय मान्यता प्राप्त कामाच्या निविदा प्रक्रिया जलसंधारण महामंडळाच्या संचालक/कार्यकारी समितीच्या मान्यतेने अंतिम करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

**कृषी विभागाकडून मजगी योजनेच्या कामासाठी टाकण्यात आलेली अट शिथील करण्याबाबत**

**(२४) ५१८११ (२३-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या कृषी विभागाने सरासरी १२०० मिली मीटर पेक्षा जास्त पर्जन्यमान असलेल्या ठिकाणीच मजगी योजनेची कामे करता येतील असे निकष लावले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कळवण (जि.नाशिक) हा संपूर्ण आदिवासी तालुका असुन या ठिकाणी १२०० मिली मीटर पेक्षा कमी पर्जन्यमान असल्याने कृषी विभागाला जिल्हा वार्षिक योजनेतून मजगी योजनेची कामे करण्यास अडचण होत असल्याने शेतकऱ्यांचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आदिवासी शेतकऱ्यांना मजगी योजनेसाठी असणारी १२०० मिली मीटर पेक्षा जास्त पर्जन्यमानाची अट शिथील करावी, अशी मागणीही स्थानिक लोकप्रतिनीधी यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात उक्त अट शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अशंत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मजगी योजनेची पर्जन्यमानाची अट शिथील करणे ही बाब तांत्रिक स्वरूपाची असल्याने पर्जन्याची अनिश्चितता विचारात घेवून सदर अट शिथील करण्याच्या अनुषंगाने कृषि विद्यापीठाचे अभिप्राय घेवून संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांना त्यांच्या स्तरावरून आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत दि.०८/०३/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वरुड व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यात व्दारयुक्त सिमेंट बंधारे निर्माण करण्याबाबत

**(२५) ५२६३० (१८-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून शासन निर्णय क्र.जसयो प्र मा/ प्रक्र ६०००/९५०, दिनांक ९ मे २०२२ अन्वये वरुड व मोर्शी तालुक्यात शून्य ते शंभर हेक्टर सिंचन क्षमतेच्या ३९ कोल्हापुरी बंधारे द्वारयुक्त सिमेंट बंधाऱ्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामासंदर्भात अपर आयुक्त, जलसंधारण तथा मुख्य अभियंता मृद व जलसंधारण, प्रादेशिक क्षेत्र नागपूर यांनी निविदा प्रक्रिया देखील पूर्ण केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणावर संत्रा उत्पादक असलेले हे क्षेत्र कायम अति शोषित असल्यामुळे भूजल पातळी खालावलेल्या वरुड व मोर्शी या दोन्ही तालुक्यात उक्त विषयी ३९ कोल्हापुरी बंधारे द्वारयुक्त सिमेंट बंधारे निर्माण होणे गरजेचे असताना शासनाने घातलेले निर्बंध उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामांची निविदा प्रक्रिया पूर्णपणे झालेली नाही. सदर कामांची निविदा शासन निर्णय क्र.मजम-२०२२/प्र.क्र.१४३/जल-३,दि.८.७.२०२२ नुसार रद्द करण्यात आली आहे.

(३) सदर कामांची निविदा शासन निर्णय क्र.मजम-२०२२/प्र.क्र.१४३/जल-३,दि.८.७.२०२२ नुसार रद्द करण्यात आली आहे. तसेच स्थगिती उठविण्याबाबत शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अनुदानित वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(२६) ५३०२६ (१८-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना २४ तास सेवेत कार्यरत असतांनाही अल्प वेतनवावर काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागातील आश्रमशाळा व वसतीगृहातील कर्मचाऱ्यांप्रमाणे "समान काम समान दाम" या तत्वावर अनुदानित वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय अनुदानित वसतीगृहाच्या वतीने मा. मुख्यमंत्री व मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०५-२०२३) :** (१) नाही.

(२) होय.

(३) सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय, दिनांक १६.३.१९९८ अन्वये विहीत केलेल्या नियमावलीनुसार स्वयंसेवी संस्था संचलित वसतिगृह कर्मचाऱ्यांना मानधन देय असून त्यांना वेतनश्रेणी अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घडोळी (ता. जिंतूर, जि. परभणी) येथे पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याला दरवाजे लावण्याबाबत

**(२७) ५३४९२ (२२-०१-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घडोळी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याला दरवाजे नसल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी सर्वत्र जास्त पाऊस झाल्यामुळे नदी बंधारे तुडुंब भरले त्यामुळे सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार अशी आशा शेतकऱ्यांना वाटत असताना येलदरी धरणातील कोल्हापुरी बंधाऱ्याचे दरवाजे काढण्यात आल्याने शेतकरी सिंचनापासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिंतूर तालुक्यातील हिवरखेडा येथील पूर्णा नदीवरील चिचखेडा कोल्हापुरी बंधाऱ्यावर संस्था स्थापन करून शेतकऱ्यांसाठी पाण्याचा साठा आरक्षित करण्यात यावा या व अन्य मागण्या शेतकरी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

घडोली कोल्हापूरी बंधारा जलसंपदा विभागाकडून दिनांक १९/०५/२०२२ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सदर बंधारा हस्तांतरीत करताना बंधाऱ्याचे रबर सील खराब झालेले होत व लोखंडी दरवाजे जीर्ण होऊन वाकलेले होते. सदर बंधाऱ्याचे पावसाळ्यापुर्वी गेट काढणे व पावसाळ्यानंतर दरवाजे टाकणे हे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत घडोली कोल्हापूरी बंधाऱ्यामध्ये पाणी अडविण्यात आलेला असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना झालेला आहे. तसेच सिंचनात वृध्दी झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

येलदरी धरणाच्या खालील बाजूस पुर्णा नदीवरील खोलगाडगा व चिंचखेडा कोल्हापूरी बंधारे असून प्रचलित नियमानुसार पावसाळ्यापुर्वी व उत्तर दरवाजे काढणे व टाकणे ही कार्यवाही नियोजित वेळेत करण्यात येते.

पुर्णा प्रकल्पाचा सिंचन कार्यक्रम राबविताना येलदरी धरणातून पुर्णा नदीमार्गे सिध्देश्वर जलाशयात पाणी आणण्यात येते. त्यामुळे बंधाऱ्यात पाणीसाठा होऊन शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळतो.

(३) व (४) सदर निवेदन प्राप्त झालेली नाहीत.

महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम-२००५ अन्वये पाणी वापर संस्था स्थापन करण्याच्या अनुषंगाने अधिसुचना १ व २ जलसंपदा विभागाकडून प्रसिध्द करण्यात आलेली आहे व अधिसुचना -३ ची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील कंत्राटी चालकांना सेवेत कार्यरत ठेवण्याबाबत

**(२८) ५४३१६ (१९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व विशेषत: बुलढाणा, परभणी, पुणे व नागपूर येथील राज्य परिवहन महामंडळामध्ये कंत्राटी चालक म्हणून

नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना स्थायी करण्याची मागणी कंत्राटी चालकांनी शासनास दिलेल्या निवेदनाद्वारे केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ८०० कर्मचाऱ्यांची विविध जिल्ह्यांमध्ये चालक म्हणून नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकल्याने त्यांच्या कुटुंबियांची मोठया प्रमाणात उपासमार सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार वाहतूक सुविधा सुरळीत राहण्याकरिता कंत्राटी कर्मचाऱ्यांना राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेत कायम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) रा.प. कर्मचाऱ्यांनी दिनांक २७.१०.२०२१ पासून बेमुदत संप केला. महामंडळाने प्रवाशांची व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आपात्कालीन परिस्थितीत दिनांक ०७.०१.२०२२ पासून वृत्तपत्रात जाहिरात देऊन बाहय संस्थेमार्फत कंत्राटी चालकांची एक महिन्यासाठी नियुक्ती केली. दिनांक २२.०४.२०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने, "कामावर हजर व्हा" असा आदेश दिल्यानंतर संपकरी कामावर हजर झाले.त्यामुळे कंत्राटी चालकांची आवश्यकता उरली नसल्यामुळे कंत्राटी चालकांची नियुक्ती रद्द करण्यात आली. त्यांची पुढे आवश्यकता नसल्याने सेवेत ठेवण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तिवरे धरण बांधण्याबाबत

**(२९) ५४९८६ (२२-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तिवरे धरण दिनांक २ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास फुटल्याने २२ लोकांचा मृत्यू झाला असून धरणाच्या पायथ्याशी असलेली गंगेचीवाडी पूर्णपणे उध्दवस्त झाल्याचे तसेच अनेक गावांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाडीतील उध्दवस्त झालेल्या कुटुंबांपैकी २४ लोकांचे अलोरे येथे पुनवर्सन करण्यात आले असून ३६ कुटुंबे तीन वर्षे उलटूनही अद्याप पुनर्वसन झाले नसल्याने ते बेघर आहेत, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, तिवरे धरण परिसरातील तिवरे, कादवड, आकले, नांदिवसे, कळकवणे, रिक्टोरी, गाणे, वालोटी, दादर आदी दसपटीतील गावांना या धरणामुळे मे अखेर पर्यंत पाणीपुरवठा केला जात होता परंतु आता धरण नसल्यामुळे या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्नुषगाने उक्त धरणामुळे उध्दवस्त झालेल्या कुटुंबाचे पुर्नवसन व तिवरे धरणावर अवलंबून असणाऱ्या गावांची पाणी टंचाई दूर करण्यासाठी नवीन धरण बांधणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०५-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर धरण फुटीप्रकरणी चौकशी करणेकरीता दि.०६/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने दि.०६.०२.२०२० रोजी अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालावर पुर्नविलोकन करणेकामी धरणफुटीमुळे उध्दवस्त झालेल्या कुटुंबाचे पुर्नवसनाबाबत मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे मार्फत कार्यवाही चालु आहे.

ल.पा. योजना तिवरे धरणाच्या पुर्न:स्थापनेच्या कामाचे रु.१४०१.५९ लक्ष रकमेचे अंदाजपत्रक मा.अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांचेकडून प्राप्त झाले आहे. पुर्न:स्थापनेचे काम हाती घेवून ३६ महिन्यामध्ये योजनेचा २४५२ स.घ.मी. पाणीसाठा पुर्नस्थापित करण्याचे विभागाचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील तिवसा, नेर, चांदूर-बाजार बस फेऱ्या बंद असल्याबाबत**

**(३०) ५५१२२ (२३-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील तिवसा, नेर, चांदूरबाजार हा राज्यमार्ग बंद असल्याने महामार्गावरील राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बस फेऱ्या दोन महिन्यांपासून बंद असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस फेऱ्या बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महामार्गाचे काम जलदगतीने करुन वाहतुक रस्ता सुरळीत करुन बसेसच्या संख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर मार्गाचे कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु असल्याने नमुद मार्ग वाहतुकीसाठी बंद होता.

(२), (३) व (४) माहे ऑगस्ट, २०२२ पासुन विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र सुरु झाल्याने व माहे सप्टेंबर २०२२ पर्यत मार्गाचे काम सुरु असल्याने चांदूर-बाजार आगाराची वाहने लेहगाव पर्यंत व मोर्शी आगाराची वाहने नेर वरुन तिवसा पर्यंत चालनात होती. सदर मार्गावरील बस फेऱ्या मार्गाचे काम पुर्ण झाल्या नंतर २६ फेऱ्या पुर्ववत सुरु करण्यात आल्या आहेत.

---

**मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील बसस्थानकांच्या इमारतीबाबत**

**(३१) ५५४५५ (२२-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील बसस्थानकांच्या इमारतीकरिता जागा निश्चिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच पारोळा, एरंडोल, पिंपळकोठा, लोणीसीम, उत्राण गु.ह.देवगांव येथील बसस्थानकांच्या विविध समस्या तातडीने सोडविण्याकरिताही स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केलेली आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बसस्थानकांच्या इमारतीकरिता जागेची निश्चिती व त्यानुसार आवश्यक त्या निधीची तरतूद शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तसेच उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) पारोळा, एरंडोल येथील बसस्थानकांच्या वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण करण्याचे अंदाजपत्रक प्राप्त झाले असून पुढील कार्यवाही चालू आहे.

उर्वरित गावांना रा.प.महामंडळाची स्वमालकिची जागा उपलब्ध नाही. तथापि,सदर ठिकाणी स्थानिक लोक प्रतिनिधींच्या फंडातून गावठाण परिसरात मार्गनिवारे बांधण्यात आलेली आहेत.

---

**रुई (बु.) (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील सैनिकास अपंगत्व आल्याने शासनाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(३२) ५५४६३ (२४-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुई (बु.) (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील रहिवासी श्री.भास्कर गंगाधर गोरठकर यांना दिनांक २३ डिसेंबर, २००१ रोजी वा त्यासुमारास ओपीएस पराक्रम सांबा जम्मू कश्मीरमध्ये पाकिस्तानी हल्ल्यात गोळी लागून ५० टक्के अपंगत्व आले असून त्यांना महाराष्ट्र शासनाचा ताम्रपट प्रदान करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.गोरठकर यांनी सन २०२० पासून वेळोवेळी शासन सेवेत घेण्याबाबत अर्ज करून त्यांना अद्याप राज्य शासनाच्या सेवेत घेण्यात आले नसून त्यांनी दिनांक २१ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाच्या सेवेत घेण्याचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तसेच उक्त निवेदनाच्या अनुषंगाने श्री.गोरठकर यांना शासनाच्या सेवेत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०५-२०२३) :** (१) होय, त्यांना ताम्रपट प्रदान करण्यात आले तसेच कर्तव्य बजावताना ५०% अपंगत्व आल्याने राज्य शासनाकडून रु ३ लक्ष इतकी आर्थिक मदत अदा करण्यात आली आहे.

(२) होय, परंतू श्री गोरठकर हे अर्धसैनिक बलाचे सेवेतील असल्याने माजी सैनिकाप्रमाणे राज्य शासन सेवेत आरक्षणाची सुविधा त्यांना लागू नाही.

(३) श्री.गोरठकर हे १०९ सीमा सुरक्षा बलातून सेवा निवृत्त झाले आहेत. केंद्र शासनाद्वारे सी.आर.पी.एफ./ बी.एस.एफ./सी.आय.एस.एफ./आय.टी.बी.पी/ एस. एस.बी या दलातील कर्मचा-यांना माजी केंद्रीय हत्यारी पोलीस दलाचा (Ex-CAPF) दर्जा देण्यात आला असून ते माजी सैनिकांच्या व्याख्येत येत नाहीत. सबब शासन परिपत्रक क्रमांक न्याय-२०१४/ कोर्ट-९/(प्र.क्र.२४४/१४)/२८,दिनांक११.०९.२०१४ मध्ये नमूद केल्यानुसार माजी सैनिकांना देण्यात येणा-या सोई-सुविधा श्री गोरठकर यांना लागू होत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेल्या वॉलमनच्या मनमानी कारभाराबाबत**

**(३३) ५६७४९ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभागात एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या वॉलमनच्या बदल्यांचे आदेश कार्यकारी तथा शहर अभियंता यांनी दिनांक २७ जुलै, २०२० रोजी पारित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे आदेश होऊन जवळपास २ वर्षांचा कालावधी लोटला असतानादेखील एकही वॉलमनने बदलीच्या ठिकाणी पदभार घेतला नाही त्याचप्रमाणे या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या एकही वॉलमनवर कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार शहरातील वॉलमनच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरातील सर्व प्रभागात कार्यरत असलेल्या वॉलमनची बदल्या करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) वसई विरार शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाअंतर्गत वॉलमन हे ठेका पध्दतीने कार्यरत आहेत. दरम्यान दिनांक २७.०७.२०२० च्या बदली आदेशानुसार सदर वॉलमन बदलीच्या ठिकाणी रुजू झाले होते.

तथापि, सदर ठेका पध्दतीने कार्यरत वॉलमनना बदलीच्या नवीन ठिकाणी येणाऱ्या अडचणी, कोविड-१९ परिस्थिती, मुसळधार पावसाळा इत्यादी कारणामुळे शहरातील पाणीपुरवठा संदर्भात तक्रारींच्या संख्येत वाढ झाल्याने यापूर्वी करण्यात आलेल्या बदल्या तुर्त रद्द करुन त्यांना बदलीपूर्व ठिकाणी रुजू होण्याच्या सूचना महानगरपालिका स्तरावरुन देण्यात आल्या होत्या.

दरम्यान शहरातील पाणीपुरवठा विभागात कार्यरत वॉलमनच्या कारभाराबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तद्नंतर शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थापन व देखभाल दुरुस्तीकरिता निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर ठेकेदारास दिनांक २४.११.२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आला असून वॉलमन, मजूर इत्यादी कर्मचारी उपरोक्त ठेकेदाराच्या मार्फत पाणीपुरवठा विभागात काम करीत असल्याचे महानगरपालिकेने कळिवले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार (जि.पालघर) शहर महानगरपालिका क्षेत्रात मनवेलपाडा मुख्य रस्त्यावर अनधिकृतपणे होत असलेल्या खाजगी बस पार्किंगबाबत

**(३४) ५६७५० (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-बी कार्यक्षेत्रातील मनवेलपाडा मुख्य रस्त्यावर अगदी रहदारीच्या ठिकाणी पर्यटन कंपनीच्या खाजगी बसेसची मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररीत्या पार्किंग केली जात असल्यामुळे स्थानिक नागरिकांचा प्रचंड रोष आणि होणाऱ्या त्रासाच्या विरोधात पालघर जिल्हा प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने दिनांक १५ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास मनवेलपाडा, विरार पूर्व या ठिकाणी तीव्र आंदोलन छेडण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ही बेकायदेशीर खाजगी बस पार्किंग तात्काळ बंद करून या खाजगी वाहनांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-बी कार्यक्षेत्रातील मनवेलपाडा मुख्य रस्त्यावर अगदी रहदारीच्या ठिकाणी पर्यटन कंपनीच्या खाजगी बसेसची मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररीत्या पार्किंग केली जात असल्यामुळे स्थानिक नागरिकांचा प्रचंड रोष आणि होणाऱ्या त्रासाच्या विरोधात मनवेलपाडा, विरार पूर्व या ठिकाणी तीव्र आंदोलन छेडण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच उपरोक्त पार्किंग तात्काळ बंद करणेबाबतचे निवेदन वसई विरार शहर महानगरपालिका स्तरावर प्राप्त झाले आहे.

(३) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील तरतुदी अन्वये सदर प्रकरणी परिवहन कार्यालय, चंदनसार, विरार रोड यांना संपर्क करुन संबंधित खाजगी बस चालकांवर तात्काळ कारवाई करणेबाबत अवगत करण्यात आले आहे. तसेच खाजगी बस वाहनांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पर्यायी जागेचा शोध सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार (जि. पालघर) शहरातील प्रदूषण आणि पर्यावरणाची सद्य:स्थिती दर्शविणाऱ्या पर्यावरण अहवालाबाबत**

**(३५) ५६८०८ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहरातील प्रदूषण आणि पर्यावरणाची सद्य:स्थिती दर्शविणारा पर्यावरण अहवाल मागील तीन वर्षांपासून तयार केला नसल्याची बाब प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी, पालघर, आयुक्त, वसई-विरार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद प्रशासन शाखा, पालघर यांनी दिनांक ३१ मे, २०२२, दिनांक २२ जुलै, २०२२ आणि त्यानंतर पुन्हा दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांना कारवाई करण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने कोणत्या स्वरूपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) व २) अशा प्रकारचे निवेदन वसई-विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

दरम्यान जिल्हा प्रशासन अधिकारी, पालघर यांच्यामार्फत सदर प्रकरणी उचित कार्यवाही करण्याकरिता वसई-विरार शहर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(३) सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ या तीन वर्षाचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ESR) तयार करणेकरिता पर्यावरण विज्ञान आणि अभियांत्रिकी विभाग, आय.आय.टी.पवई, मुंबई या शासकीय संस्थेला कार्यादेश देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत उक्त अहवाल (ESR) तयार करण्याचे काम सुरु असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार (जि. पालघर) शहरात अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (फायर ऑडिट) प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(३६) ५६८०९ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील २० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (फायर ऑडिट) प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे एक कालबद्ध आणि नियोजनबद्ध मोहीम हाती घेऊन ही प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, जिल्हाधिकारी, पालघर, आयुक्त, वसई-विरार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद प्रशासन शाखा, पालघर यांनी दिनांक ३१ मे, २०२२, दिनांक २२ जुलै, २०२२ आणि त्यानंतर पुन्हा दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांना कारवाई करण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार शहरात अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (फायर ऑडिट) प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) व (२) अशा प्रकारचा पत्र व्यवहार महानगरपालिका स्तरावर झाल्याची वस्तुस्थिती आहे.
(३) सदर प्रकरणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील औद्योगिक वसाहतीमधील कारखाने, व्यापारी संकुले या ठिकाणी अग्नी सुरक्षा उपाय योजना करण्याकरिता नोटीस बजावून त्याचे अनुपालन करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
तसेच सर्व रुग्णालय, शाळा, महाविद्यालय येथील अग्नीसुरक्षा लेखापरिक्षण पुर्ण झाल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.
महानगरपालिका क्षेत्रातील विविध आस्थापनांचे अग्नीसुरक्षा लेखापरिक्षण जलद गतीने होण्याकरिता पॅनल नियुक्तीची प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर राबविण्यात येत आहे. या व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत मॉक ड्रील घेणे, आग लागल्यास काय उपाययोजना करण्यात यावी इ. बाबत जनजागृती करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांडस चिंचोली (ता.माजलगाव, जि.बीड) या गावचे विशेष बाब म्हणुन पुर्नवसन करणेबाबत

**(३७) ५७३७२ (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांडस चिंचोली (ता.माजलगाव, जि.बीड) या गावचे विशेष बाब म्हणुन पुर्नवसन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी तत्कालीन मा.मंत्री (मदत व पुर्नवसन) यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मा.मंत्री यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना तपासुन प्रस्ताव सादर करा असे पृष्ठांकन केलेले पत्र जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी उपविभागीय अधिकारी, माजलगाव, जि.बीड यांना दिनांक ४ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागवून मा. मंत्री यांनी पृष्ठांकन केलेले पत्र दिनांक २३ जून, २०२२ रोजी प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे काय, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्याअनुषंगाने सदर गावचे विशेष पुनर्वसन करण्याबाबत तसेच सदर प्रकरणी दफ्तर दिरंगाई केल्याप्रकरणी दोषीविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०५-२०२३) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) सांडस चिंचोली (ता. माजलगाव, जि. बीड) या गावचे विशेष बाब म्हणुन पुनर्वसन करणेबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.१०.०२.२०२३ च्या पत्रान्वये शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तथापि दि.१४.१०.२०२२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार प्रस्ताव सादर करण्याविषयी विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील आजी-माजी सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध अडीअडचणीबाबत

**(३८) ५७४९२ (२५-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आजी-माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांवर मारहाण करून खोटे गुन्हे दाखल करण्यात येणे, शासन निर्णयानुसार अमृत जवान अभियान, २०२२ या निर्णयाची अंमलबजावणी होत नसणे, शहीद सैनिकांच्या वीर पत्नींना

जमिनी देण्याच्या कार्यवाहीमध्ये विनाकारण विलंब होणे, शासनाने बांधलेल्या शहीद जवानांच्या स्मारकांची निगा राखली जात नसणे याबाबत शासन दरबारी सातत्याने पत्रव्यवहार करून देखील न्याय मिळत नसल्याने आजी-माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार आजी-माजी सैनिकांच्या कुटुंबीयांना सन्मानपुर्वक वागणूक व त्याच्या समस्यावर कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०५-२०२३) :** (१) नाही,

तत्पूर्वीच, राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये माजी सैनिक, शहीद जवान, जवान विधवा, जवान कुटुंबीय व सेवेत कार्यरत सैनिकांच्या प्रलंबित कामांचा निपटारा जलद होण्यासाठी१ मे, “महाराष्ट्र दिन” हे औचित्य साधून माहे १ मे, २०२२ ते १५ जून, २०२२ या कालावधीत “अमृत जवान अभियान २०२२” संपूर्ण राज्यात राबविण्याबाबत, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -२०२२/प्र.क्र.४४/२८ (अर्थ),दि. १३/०४/२०२२ निर्गमित करण्यात आला आहे.
(२) अमृत जवान अभियानामध्ये प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी “अमृत जवान सन्मान दिन” आयोजित करून लोकशाही दिनाच्या धर्तीवर संबंधित विभाग प्रमुख व सैनिक अर्जदार यांचे उपस्थितीत सर्व विषयांचा समक्ष आढावा घेण्याबाबत तसेच सदर अभियानाच्या कालावधीत त्यांच्या प्रश्नांच्या निरसनासाठी विशेष मेळावे देखील घेण्याबाबत उक्त शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील ठाणे महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत बांधकामाबाबत**

**(३९) ५७६०८ (२४-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत बांधकामे वाढत असल्याबाबत महानगरपालिका आयुक्त, श्री.अभिजित बांगर यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले त्यानुसार, किती बांधकामे अनाधिकृत आहेत तसेच या अनाधिकृत बांधकामांवर आतापर्यंत पालिका प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामावर कारवाई करणे अंतर्गत दिनांक ०५.०१.२०२३ रोजी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या स्तरावर सर्व संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर बैठकीत महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामावर शासन निर्णय दिनांक ०२.०३.२००९ मधील मार्गदर्शक सूचना अन्वये कारवाई करण्याचे सक्त निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या स्तरावरुन देण्यात आले आहेत.

तथापि, सन २०२२-२३ मध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील निदर्शनास आलेल्या ८१९ अनाधिकृत बांधकामांवर कारवाई केली असून १८४ प्रकरणात गुन्हे दाखल केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे महानगरपालिका हद्दीतील धर्मवीर नगर तुळशीधाम येथील बी.एस.यु.पी. योजनेबाबत

**(४०) ५७६२१ (२४-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील धर्मवीर नगर तुळशीधाम येथील बी.एस.यु.पी. योजनेतील सहा सदनिका खंडणी स्वरुपात देण्याकरिता ठाणे महानगरपालिकेतील श्री.महेश आहेर, अधीक्षक, स्थावर मालमत्ता विभाग यांना श्री.सौरभ वर्तक व त्याच्या साथीदाराने जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याने नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले त्यानुसार जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका हद्दीतील धर्मवीर नगर तुळशीधाम येथील बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत ६ सदनिका खंडणी स्वरुपात देण्याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधीक्षक श्री.महेश आहेर यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना घडल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच, सदर प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक ०५.०१.२०२३ रोजी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात निवडणूक शाखेतील मतदार मदत केंद्रावरील कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४१) ५७९७९ (२५-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात निवडणूक शाखेतील मतदार मदत केंद्रावरील कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर व तांत्रीक सहाय्यक यांना शासन सेवेत कायमस्वरुपी करण्यात यावे अशी मागणी अनेक वर्षापासून कंत्राटी काम करणाऱ्या डेटा एन्ट्री ऑपरेटर व तांत्रीक सहाय्यक यांच्याकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी स्वरुपात गेल्या अनेक वर्षापासून काम करीत असलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर व तांत्रीक सहाय्यक यांना शासन सेवेत कायम सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) जिल्ह्यातील मतदार मदत केंद्राकरीता आवश्यक मनुष्यबळ जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेद्वारा मतदार मदत केंद्रासाठी आवश्यक मनुष्यबळ सेवा पुरवणाऱ्या बाह्य यंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्यात येते. सदर मनुष्यबळाकडून शासन सेवेत समायोजन करण्याबाबतची निवेदने प्राप्त झाली आहे.

(२) राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि. २ फेब्रुवारी २०१३ अन्वये बाह्ययंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करुन घेण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.
तद्नुषंगाने, मतदार मदत केंद्राच्या मुदतवाढी संदर्भात निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेद्वारा मतदार मदत केंद्रासाठी आवश्यक मनुष्यबळ सेवा पुरवणाऱ्या बाह्य यंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्याचे निर्देश आहेत.
यानुसार उपलब्ध मनुष्यबळ हे बाह्य सेवा पुरवठादार यांचे कर्मचारी आहेत. त्यामुळे सदर मनुष्यबळास शासन सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सफाई कामगारांचे प्रश्न निकाली काढण्याबाबत

**(४२) ५८३२७ (२६-०४-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सफाई कागमारांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अधिकारी व सफाई कामगार संघटनांच्या प्रतिनिधी समवेत बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत झालेले निर्णय सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना पाठवून ही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सफाई कामगारांचे प्रश्न तातडीने निकाली काढावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०२० रोजी ईमेलव्दारे केली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सफाई कामगारांचे उक्त प्रश्न निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने लाड समितीने केलेल्या शिफारशींनुसार प्रचलित शासन निर्णयातील तरतुदींमध्ये अधिक सुसूत्रता आणण्याकरीता विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक बाबींचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर केला असता, दि.२१.०९.२०२२ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) उपलब्ध माहितीनुसार दिनांक ८ ऑगस्ट, २०२० रोजीच्या ई-मेलचा शोध घेतला असता, सदर ई-मेल कार्यासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या मा.मंत्रीमंडळ उपसमितीची पहिली बैठक मा.उपमुख्यमंत्री तथा मा. उपसमितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षेखाली दिनांक ७/१२/२०२२ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत सर्व शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली.

त्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मा.मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या निर्देशानुसार प्रस्तावित सुधारीत शासन निर्णयाचे सादरीकरण दि.०७.०२.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. सदर सादरीकरणाच्या वेळी मा.उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मा.मंत्रिमंडळ उपसमिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार लाड समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ परिपत्रकातील तरतुदींमध्ये सुस्पष्ट सुधारणांचा समावेश करुन शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन दि.२४.०२.२०२३ रोजी सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

**राज्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांसाठी प्रारूप आराखडा सादर करण्याच्या निर्देशाबाबत**

**(४३) ५८४४९ (२१-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी देण्यासाठी पागे समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या धोरणात सर्वसमावेशक तरतूदींचा समावेश करून त्याबाबतचा प्रारूप आराखडा सादर करण्याचे निर्देश दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास वित्त व नियोजन मंत्री महोदयांनी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्देशानुसार परिपुर्ण असा प्रारूप आराखडा शासनास सादर झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रारूप आराखडयास शासन मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.वित्त व नियोजन मंत्री महोदयांनी कोणतेही निर्देश दिल्याचे कार्यालयीन अभिलेख्यावर आढळून येत नाही.

तथापि, दिनांक २९/९/२०२२ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत सफाई कामगारांच्या वारसा हक्क अंमलबजावणीकरीता सर्व शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार मा.मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केल्याबाबतचा शासन निर्णय दि.२१.११.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) व (३) मा.उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मा.मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या निर्देशानुसार प्रस्तावित सुधारीत शासन निर्णयाचे सादरीकरण दि.०७.०२.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. सदर सादरीकरणाच्या वेळी मा.उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मा.मंत्रिमंडळ उपसमिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार लाड समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ परिपत्रकातील तरतुदींमध्ये सुस्पष्ट सुधारणांचा समावेश करुन शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन दि.२४.०२.२०२३ रोजी सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या शाळांची झालेली दुरवस्था**

**(४४) ५९०२८ (२१-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून जवळपास ४९ शाळा कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महानगरपालिकेच्या शाळांची दुरावस्था झाली असून, त्या अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याने, सदर शाळेतील श्रेणी १ मधील २ शाळा तसेच श्रेणी २ मध्ये २५ शाळा धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सदर शाळांना मानव अधिकार आयोगाने शाळांच्या सद्य:स्थितीबाबत नोटीस बजावलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांच्या डागडुजी व दुरुस्तीकरिता प्रशासनामार्फत निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून जवळपास ४९ शाळा कार्यरत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या ४९ शाळा इमारतीपैकी ४४ इमारती या सुमारे ३० वर्षापुर्वीच्या असल्याने त्यांच्या डागडूजी व दुरूस्तीकरिता महानगरपालिकेमार्फत शालेय शिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्याकडे निधी मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तथापि, सदर प्रकरणी प्रथम टप्प्यात रुपये ३० कोटी निधीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरू असल्याचे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाचे स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४५) ५९७८१ (२४-०४-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक रोड (ता.जि.नाशिक) येथील विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाचे स्थापन करण्याचे नियोजित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाचे बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सेवा यांना दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे व दिनांक १ ऑगस्ट २०२२ व २२ ऑगस्ट २०२२ रोजीच्या स्मरणपत्राव्दारे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने अप्पर मुख्य सचिव सेवा, सामान्य प्रशासन महाराष्ट्र शासन यांनी क्र.टीआरएन-२०२१/प्र.क्र.१४५/ १२-अ दि.११ मार्च २०२२ च्या संदर्भीय पत्राव्दारे विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,नाशिक या संस्थेच्या नवीन संकुल बांधकामाच्या १२२.२५ कोटी इतक्या रकमेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकातील स्थापत्य कामाच्या सर्वसाधारण वर्णनानुसार नमूद बाबी संदर्भात फेरविचार करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,नाशिक यांना आदेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था.नाशिक व सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी अद्याप पर्यंत सदरील प्रस्ताव सादर केले नसल्याचे माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाचे स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाचे बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १० जानेवारी, २०२२, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२ तसेच दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२ व दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ च्या पत्राव्दारे विनंती केली आहे.

(३) होय, शासन पत्र क्र. टीआरएन-२०२१/प्र.क्र.१४५/१२-अ, दि.११ मार्च, २०२२ अन्वये प्रस्तुत प्रकरणी सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था नाशिक यांना कळविले आहे.

(४) व (५) नाशिक विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था कार्यालय, नाशिक रोड, नाशिक यांनी दिनांक ११ मार्च, २०२२ च्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले होते. तथापि सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडून सुधारित अंदाजपत्रकाचा प्रस्ताव अप्राप्त असल्याने त्यांनी दिनांक २० जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना सध्यस्थितीत प्राध्यान्य दयावयाच्या बाबींचा समावेश करुन कमी खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडा सादर करण्याचे कळविले आहे.

---

## नाशिक महानगरपालिकेतील दलित वस्ती सुधारणा योजनेच्या प्रस्तावाबाबत

**(४६) ६०६०५ (११-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक सहा येथील दलित व इतर वस्तीत अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कामे दिनांक १६ जानेवारी २०२२, वा त्यासुमारास मंजूर करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाबाबत नाशिक महानगरपालिकेने इतर दलित वस्ती सुधारणा योजनेचा प्रस्ताव सादर केलेला असताना देखील ठेकेदाराशी संगनमत करून जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू दलित वस्तीसाठी आरक्षित असलेला निधी दलित इतर वस्तीसाठी खर्च करणाऱ्या जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या विशेष घटक जिल्हास्तर योजनेंतर्गत नाशिक महानगरपालिकेने “पंचवटी प्रभाग क्र.६ मधील गांधारवाडी भागात अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे” या कामाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिनांक २२.१०.२०२१ रोजी सादर केला होता, हे खरे आहे.

प्रस्तुत कामाचे स्थळपाहणी करुन शिफारस / अहवाल सादर करण्यासाठी समाज कल्याण विभाग, नाशिक यांना जिल्हाधिकारी, नाशिक यांनी पाठविले होते.

समाज कल्याण विभाग, नाशिक यांनी शिफारस केल्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २४.०३.२०२२ अन्वये सदर कामाला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सबब, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनांतर्गत आरक्षित निधी त्याच घटकासाठी उपयोगात आणला असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केला आहे.

---

## राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागु करण्याबाबत

**(४७) ६०७७९ (२५-०४-२०२३). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २३८८ स्वयंसेवी संस्थामार्फत अनुसूचित जाती, जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहे चालविण्यात येत असल्याचे माहे जोनवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मागासवर्गीय अनुदानीत वसतीगृहातील तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, अशी मागणी शासनाकडे वारंवार महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय अनुदानित वसतीगृह अधिक्षक व इतर कर्मचारी संघटना, चंद्रपूर यांनी केल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्य आश्रमशाळा संलग्न वसतीगृहाप्रमाणे "समान काम समान वेतन" या तत्वावर अनुदानीत मागासवर्गीय वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात यावी अशी मागणी करत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील वसतिगृह अधिक्षक, स्वयंपाकी, मदतनीस व चौकीदार या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीऐवजी एकत्रित मानधन देण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०५-२०२३) :** (१) शासनाकडून राज्यात मागासवर्गीय मुलामुलींसाठी स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृह योजना चालविण्यात येते.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) सामाजिक न्याय विभाग,शासन निर्णय, दिनांक १६.३.१९९८ अन्वये विहीत केलेल्या नियमावलीनुसार स्वयंसेवी संस्था संचलित वसतिगृह कर्मचाऱ्यांना मानधन देय असून त्यांना वेतनश्रेणी अनुज्ञेय नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सर्व मेट्रो मार्गिकेमध्ये महिलांकरिता अधिकचा एक डबा (दोन राखीव) ठेवण्याबाबत

**(४८) ६०८६६ (११-०५-२०२३). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये वाहतुक कोंडी व वाहतूक सुरळित होण्याकरिता मेट्रो सेवा सुरु करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत घाटकोपर ते वर्सोवा ही पहिली मेट्रो -१ ची सेवा सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मेट्रोमध्ये प्रचंड गर्दी होत असल्याने महिला वर्गाची गैरसोय होत आहे त्याकरिता महिलांकरिता मेट्रोमध्ये दोन राखीव डबा ठेवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी महानगर आयुक्त, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व) यांच्याकडे दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०५-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) होय, हे खरे आहे.
महिला प्रवाश्यांसाठी घाटकोपर ते वर्सोवा दरम्यान धावणाऱ्या मेट्रो वन मध्ये एक डबा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्याचबरोबर मेट्रोच्या प्रत्येक डब्यामध्ये (मेट्रो कोच) दोन आसने महिला वर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत.

---

**पनवेल (जि. रायगड) पालिका प्रशासनाने सिडको वसाहती आणि ग्रामीण भागात पालिकेची एकही शाळा सुरु केली नसल्याबाबत**

**(४९) ६२०१४ (२४-०४-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) पालिका प्रशासनाने महापालिकेच्या स्थापनेपासून गेल्या सहा वर्षाचा थकीत मालमत्ता कर नागरीकांकडून वसूल करीत असतांनाही सिडको वसाहती आणि ग्रामीण भागात पालिकेची एकही शाळा अद्याप सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल महापालिका हद्दीतील सद्यःस्थितीत पालिकेच्या केवळ १० शाळा असून पालिका शाळांचा विस्तार करण्याच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पनवेन महापालिका हद्दीत पालिका शाळांचा विस्तार करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०५-२०२३) :** (१), (२) व (३) पनवेल महानगरपालिकेच्या ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळा कार्यान्वित आहेत. तसेच सिडको क्षेत्रात खाजगी शाळा देखील कार्यरत आहे. तसेच बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क अधिनियमान्वये शाळेतील अंतर ३ कि.मी. पेक्षा कमी असावे. यास्तव, नवीन शाळा काढणे शक्य होणार नसल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.

तसेच पनवेल महानगरपालिकेच्या पूर्वीच्या शाळापैकी एका शाळेचे बांधकाम महानगरपालिकेच्या माध्यमातून झाले असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.
पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळा कार्यान्वित आहेत. तसेच पनवेल महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत इंग्रजी माध्यम वर्ग सुरू करण्याचे प्रस्तावित करणार असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगावशेरी (जि.पुणे) येथील मतदार यादीत त्रुटी आढळल्याबाबत**

**(५०) ६२४१८ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगाव शेरी (जि. पुणे) मतदार संघातील यादीत बऱ्याच प्रमाणात त्रुटी आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दुबार नावे जेमतेम २९,००० आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच ओळखपत्र प्राप्त होण्यासाठी २ ते ३ महिने कालावधी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) अशी बाब नाही, दिनांक ०१/०१/२०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत दि. ०५/०१/२०२३ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणेत आली असून सदर यादीमध्यें कोणत्याही त्रुटी असलेबाबत या कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्धवत नाही. तथापि, मा. भारत निवडणूक आयोगाकडून मतदार यादी शुध्दीकरण व अद्यावतीकरण करण्याची प्रक्रिया निरंतर स्वरुपात राबविण्यात येते. मा. भारत निवडणूक आयोगाकडील व मा.मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार मतदार यादी शुध्दीकरण व अद्यावतीकरणाचे कामकाज केले जाते. या निरंतर मोहिमेअंतर्गत दुबार, स्थंलातरीत व मयत मतदारांची मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या मार्फत पडताळणी करण्यात येऊन वगळणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असते.
(३) मा. भारत निवडणूक आयोगाने सर्व मतदारांना मतदार ओळखपत्र स्पीड पोस्टाद्वारे वितरित करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तरी सदर सूचनांनुसार मतदार ओळखपत्रे तयार करण्यात येऊन स्पीड पोस्टाद्वारे त्यांचे वितरण मतदारांना करण्यात येते.

त्यानुसार मतदाराचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट झाल्यानंतर मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडील प्राप्त निर्देशानुसार मतदार ओळखपत्रांचा कच्चा डाटा मतदार नोंदणी अधिकारी यांच्या स्तरावरुन ER Printing Software द्वारे डाऊनलोड करण्यात येतो. त्यानंतर सदरचा डाटा मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात येतो. मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडील पुरवठाधारका मार्फत सदर मतदार ओळखपत्रांची छपाई केली जाते. व सदरची मतदार ओळखपत्रे बंद लिफाफ्यामध्ये मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त होतात. तदनंतर ERO net प्रणालीद्वारे लिफाफ्याच्या क्रमांकानुसार त्यांचे बुकींग केल्यानंतर यादीसहीत सदरचे लिफाफे पोस्टामध्ये जमा केले जातात. मतदाराला त्याचे मतदार ओळखपत्र स्पीड पोस्टद्वारे पोस्टामार्फत वितरीत करण्यात येते.

तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर मतदार ओळखपत्रे मतदारांना वितरित होत असल्यामुळे या सर्व प्रक्रियेस कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.
(४) अशी बाब नाही.
(५) अशी बाब नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव (१) कार्यभार,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.